

# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६





## माझी भूमिका, आपले प्रगतीपुस्तक

### प्रभागासाठी विकासाचा निर्धार

महानगरपालिकेच्या मागील पंचवार्षिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला, तो माझ्यासाठी सन्मानासोबतच मोठी जबाबदारीही होती. त्या विश्वासाच्या जोरावरच मी निवडून आले आणि गेल्या पाच वर्षांत प्रभागातील प्रत्येक गल्लीत, प्रत्येक कॉलनीत शक्य तेवढी कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड आणि त्या परिसरातील विविध कॉलन्यांमध्ये मूलभूत सुविधा, नागरी समस्या, दैनंदिन अडचणी यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला. काही कामे पूर्ण झाली, काही प्रक्रियेत राहिली; मात्र एकही प्रश्न दुर्लक्षित राहू दिला नाही, ही माझी ठाम भूमिका आहे. आता येणारी महानगरपालिका निवडणूक मी पुन्हा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय कोणत्याही व्यक्तिगत स्वार्थासाठी नसून, अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी आणि प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आहे. विकासाची ही लढाई एकटीची नसते; ती सर्वांच्या सहकार्यानेच जिंकता येते, याची मला पूर्ण जाणीव आहे. प्रभाग क्रमांक ३ हा विविध कॉलन्यांनी आणि विविध घटकांनी बनलेला आहे. त्यामुळे या परिसरात वास्तव्यास असलेल्या तुमच्या मित्रपरिवार, नातेवाईक, ओळखीतील नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी तुमचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या नावांसह संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिल्यास, थेट संवाद साधून विकासाची पुढील दिशा मांडणे शक्य होईल. मागील पाच वर्षांत जे शक्य झाले ते प्रामाणिकपणे केले आहे आणि जे काम बाकी आहे, ते येत्या काळात पूर्ण करीनहा केवळ शब्द नाही, तर माझी सार्वजनिक जबाबदारी आहे. विश्वास, संपर्क आणि सहकार्याच्या बळावर प्रभाग क्रमांक ३ ला अधिक सक्षम, अधिक सुव्यवस्थित आणि विकासाभिमुख बनवण्याचा माझा निर्धार आहे.

**प्रभाग क्रमांक ०३**
**सौ.ज्योती अमोल गाडे**
**माजी नगरसेविका**
**८९७५८७२५२५**

# राठोडांची अपक्ष उमेदवारी? शहरात चर्चांना उधाण




**अहमदनगर । रयत समाचार**

येऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा सेनेचे राज्य सचिव विक्रम अनिलभैय्या राठोड यांच्या पत्नीने अपक्ष उमेदवारी लढवण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा शहरात जोर धरू लागली आहे. या संभाव्य निर्णयामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये विविध तर्क-वितर्क मांडले जात आहेत. सन २००३ मध्ये महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर दिवंगत आमदार अनिलभैय्या राठोड यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने प्रत्येक पालिकेची निवडणूक लढवली आणि प्रत्येक निवडणुकीत यशही मिळवले. गेल्या सुमारे ४० वर्षांपासून शहराच्या राजकारणात सक्रिय असलेल्या अनिलभैय्या राठोड यांनी कधीही पक्षनिष्ठा सोडली नाही. त्यांच्या निधनानंतरही त्यांचे चिरंजीव युवासेनेचे विक्रम राठोड यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पक्षाशी प्रामाणिक भूमिका कायम ठेवली आहे. मात्र, आगामी महानगरपालिका निवडणुकीत विक्रम राठोड यांच्या पत्नी अपक्ष उमेदवारी करण्याच्या चर्चेमुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ठाकरेंच्या शिवसेनेत अलीकडेच काँग्रेसमधून प्रवेश केलेल्या किरण काळे यांच्या हातात तिकीट वाटपाची सूत्रे असल्याने, तिकीट वाटपात पक्षनिष्ठेपेक्षा वैयक्तिक मर्जीला प्राधान्य दिले जात आहे का, अशी कुजबुज शहरात सुरू आहे. राजकीय जाणकारांच्या मते, जर राठोड कुटुंबाला निवडणूक प्रक्रियेतून प्रत्यक्षात बाजूला ठेवण्यात आले, तर ठाकरेंच्या शिवसेनेला शहरात मोठा फटका बसू शकतो. आजही शिवालयाचा शब्द अंतिम मानणारा आणि अनिलभैय्या राठोड यांना मानणारा मोठा निष्ठावान वर्ग शहरात सक्रिय आहे. ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य पक्षासाठी घालवले त्यांच्यावर जर ही वेळ येत असेल तर पक्षाला विचार करण्याची नक्कीच गरज आहे आणि जर राठोड यांनी वेगळा विचार केला तर शहरात ठाकरेंची शिवसेना नाममात्र होईल अशा परिस्थितीत त्यांच्या घरालाच तिकीट न मिळाल्यास, पक्षासाठी ही निवडणूक अधिकच अवघड ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकंदरीत, राठोड कुटुंबाच्या भूमिकेकडे आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या तिकिट वाटपाच्या निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, पुढील काही दिवसांत राजकीय चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

> **ठाकरेंच्या शिवसेनेत अलीकडेच काँग्रेसमधून प्रवेश केलेल्या किरण काळे यांच्या हातात तिकीट वाटपाची सूत्रे असल्याने, तिकीट वाटपात पक्षनिष्ठेपेक्षा वैयक्तिक मर्जीला प्राधान्य दिले जात आहे का, अशी कुजबुज शहरात सुरू आहे. राजकीय जाणकारांच्या मते, जर राठोड कुटुंबाला निवडणूक प्रक्रियेतून प्रत्यक्षात बाजूला ठेवण्यात आले, तर ठाकरेंच्या शिवसेनेला शहरात मोठा फटका बसू शकतो. आजही शिवालयाचा शब्द अंतिम मानणारा आणि अनिलभैय्या राठोड यांना मानणारा मोठा निष्ठावान वर्ग शहरात सक्रिय आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या घरालाच तिकीट न मिळाल्यास, पक्षासाठी ही निवडणूक अधिकच अवघड ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकंदरीत, राठोड कुटुंबाच्या भूमिकेकडे आणि शिवसेनेच्या तिकीट वाटपाच्या निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, पुढील काही दिवसांत राजकीय चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.**





# मतदान अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षणाचा समारोप

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगर पालिकेच्या वतीने येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी काल सोमवार, ता. २९ डिसेंबर २०२५ रोजी विशेष प्रशिक्षण वर्ग यशस्वीपणे पार पडला. या प्रशिक्षणात निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्पे, जबाबदाऱ्या व नियमावली याबाबत सविस्तर व सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शहरातील एकूण १७ प्रभागांमधील ३४५ मतदान केंद्रांवरील (बूथ) व्यवस्थापन, मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता व अचूकता राखण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी स्पष्ट करण्यात आल्या. निवडणूक प्रक्रिया निर्भय, सुरळीत व विश्वासार्ह पार पडावी यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

यावेळी ईव्हीएम मशीनच्या वापराबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले असून मतदान प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा सविस्तरपणे समजावून सांगण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमास महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त डॉ. विजयकुमार मुंडे तसेच नगरसचिव मेहेर लहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता व जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक कर्तव्य अत्यंत जबाबदारीने, नियमांचे काटेकोर पालन करून पार पाडावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून आगामी महापालिका निवडणूक प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.


# शिवसेना वेगळी लढणार, भाजप-राष्ट्रवादी युती निश्चित

**अहमदनगर । रयत समाचार**




अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठी राजकीय घडामोड समोर आली असून महायुतीत अधिकृतपणे फूट पडल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेना (शिंदे गट) ही निवडणूक स्वतंत्रपणे लढवणार असल्याची घोषणा जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केली. त्यामुळे भाजपराष्ट्रवादी काँग्रेस यांची युती कायम राहणार असून, शिवसेना वेगळ्या मार्गाने निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपत असताना शेवटच्या टप्प्यातही राजकीय संभ्रम कायम होता. मात्र शिवसेनेच्या या अधिकृत घोषणेमुळे नगरच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांच्यात जागावाटपावरून गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. मात्र या चर्चांना कोणताही निष्कर्ष न लागल्याने अखेर शिवसेनेने स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे अनिल शिंदे यांनी स्पष्ट केले. अनिल शिंदे म्हणाले की, ''शिवसेनेला अपेक्षित सन्मानजनक जागा न मिळाल्यामुळे आणि सातत्याने टाळाटाळ होत असल्याने आम्ही स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना प्रत्येक प्रभागात सक्षम उमेदवार देणार आहे.'' दरम्यान, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात मात्र युती निश्चित झाल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. दोन्ही पक्षांकडून जागावाटपावर अंतिम चर्चा पूर्ण झाल्याचे समजते. त्यामुळे आता महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपराष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना अशी थेट लढत पाहायला मिळणार आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक प्रभागांत एकाच पक्षाकडून दोन-दोन अर्ज, तसेच काही ठिकाणी पती-पत्नींकडून अर्ज दाखल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे उमेदवारीबाबत संभ्रम वाढला असला तरी पुढील काही तासांत चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी नगरमध्ये तळ ठोकून आमदार संग्राम जगताप तसेच विविध नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. मात्र महायुतीतून शिवसेना बाहेर पडल्याने राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून, आगामी निवडणूक अधिकच चुरशीची ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




# प्रभाग ८ मधून राष्ट्रवादीचे कुमारसिंह वाकळे, बाबुशेठ नागरगोजे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून प्रभाग क्रमांक ८ मधून माजी सभापती कुमारसिंह वाकळे आणि बाबुशेठ नागरगोजे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी मोठ्या उत्साहात व शक्तीप्रदर्शनासह अर्ज भरण्यात आला असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली प्रभागातील विकासकामांना गती दिली. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था तसेच नागरी सुविधांच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याने प्रभागात लक्षणीय बदल झाल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जात आहे. प्रभागातील मूलभूत सुविधांबरोबरच सामाजिक उपक्रम, नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवणे आणि प्रशासनाशी समन्वय साधून विकासकामे मार्गी लावण्यावर भर देण्यात आल्याचे कार्यकर्त्यांनी यावेळी नमूद केले. या कामांच्या जोरावरच आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय निश्चित असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला. अर्ज दाखल करताना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. ''विकास हाच अजेंडा'' घेऊन मैदानात उतरलो असून प्रभागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला.



# प्रभाग १ मधून दिपाली बारस्कर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी नगरसेविका दिपालीताई बाळासाहेब बारस्कर यांनी प्रभाग क्रमांक १ मधून आपला उमेदवारी अर्ज अधिकृतपणे दाखल केला आहे. शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या पंधरा वर्षांत प्रभागात राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांच्या जोरावर नागरिकांचा भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास दिपालीताई बारस्कर यांनी व्यक्त केला. अर्ज दाखल होताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रभागात निवडणूक प्रचाराला वेग आला आहे.

## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का?
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# नऊ वर्षांपूर्वी झालेली चूक श्रीरामपूरकरांनी दुरुस्त केली- आ. ओगले

## धर्मगुरूंच्या उपस्थितीत करण ससाणे यांनी स्वीकारला पदभार

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

अटीतटीच्या निवडणुकीमध्ये आपल्या सर्वांचे सहकारी मित्र करण ससाणे हे ७००० मताधिक्याने निवडून आले. त्याबद्दल श्रीरामपूरच्या सर्व बंधू भगिनी आणि जनतेचे मी आभार व्यक्त करतो; कारण मागच्या नऊ वर्षांपूर्वी जी श्रीरामपूर मध्ये चूक झाली होती, ती चूक श्रीरामपूरकरांनी डबल मतांनी भरून काढली. येणाऱ्या काळामध्ये आपल्या सर्वांना एकत्रित घेऊन, सर्व विरोधक असुद्या, सर्वजण एकत्र येऊन श्रीरामपूरच्या चांगल्यासाठी, भल्यासाठी या ठिकाणी करणदादांच्या नेतृत्वाखाली नवीन सुरुवात केलेली आहे आणि निश्चितपणे मला खात्री आहे की सर्व धर्मगुरूंनी ज्याप्रमाणे म्हटलं, जसे आशीर्वाद दिले, पाच वर्ष नाहीतर पंचवीस वर्ष नगरपालिकेत आपण चांगला कारभार करू असे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले. नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यांनी काल सर्व धर्मगुरू तसेच माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, माजी उपनगराध्यक्ष अंजूम शेख, समीना शेख, भारती कांबळे, दत्तात्रय सानप, मुन्ना पठाण, मार्केट कमिटीचे सभापती सुधीर नवले, माऊली मुरकुटे, माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे, दिपाली ससाणे, ॲड. बीएफ चुडीवाल, प्राचार्य टी ई शेळके व शहरातील सर्व प्रमुख मान्यवरांच्या



उपस्थितीत काँग्रेसच्या सर्व नूतन नगरसेवकांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात आ. ओगले बोलत होते. ते पुढे म्हणाले की या ठिकाणी स्व. जयंत ससाणे साहेब आणि काँग्रेस पक्षाचा झेंडा हातात घेणाऱ्या सर्वांच्या ताकतीवर ही निवडणूक आपण जिंकली. आपल्या सगळ्यांचे आशीर्वाद असेच असू द्या. निवडणुकीच्या काळामध्ये आपल्या सर्वांना खूप त्रास झाला तरी आपण सर्वजण आमच्या पाठीशी उभे राहिला, पूर्ण आशीर्वाद दिला, त्याबद्दलही आपला आभारी आहे. सर्व पत्रकार मित्रांनी देखील बहुमोल सहकार्य केले कारण शेवटी तुमची साथ नसती तर खूप अवघड झालं असतं. परंतु तुम्ही साथ दिली त्याबद्दल तुमचे सगळ्यांचे धन्यवाद. कारण शेवटी एक एक माणूस महत्त्वाचा आणि प्रत्येकाने या ठिकाणी मोलाचे सहकार्य केले. ज्यांनी समोर येऊन साथ दिली, काहींनी मागे राहून आम्हाला सहकार्य केले. त्या ज्ञात अज्ञात सर्व मतदार बंधूंचे आम्ही सर्व काँग्रेस परिवाराच्या वतीने स्व. ससाणे संघटनेच्या वतीने आपले ऋण व्यक्त करतो. पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रात श्रीरामपूर अशी एकमेव नगरपालिका आहे जिथे काँग्रेस पूर्ण बहुमताने निवडून आली. सर्वांना एकत्रितपणे पुढे घेऊन जाऊ आणि ससाणे साहेबांच्या स्वप्नातील श्रीरामपूर निर्माण करू असं या ठिकाणी मी करणदादांच्या वतीने आपल्याला ग्वाही देतो. निवडणुकीच्या काळामध्ये काही मतभेद किंवा मनभेद, गैरसमज झाले असतील ते सर्वजण विसरून जाऊ.

आपण श्रीरामपूर शहरासाठी व शहराच्या विकासासाठी सर्वजण एकत्रित येऊन येणारा पुढच्या पाच वर्षांमध्ये श्रीरामपूर परत एकदा स्व. जयंत ससाणे नगराध्यक्ष असताना जी परिस्थिती होती तशी आपण सर्वजण मिळून आणू असे सांगून त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले. नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यावेळी म्हणाले की, मी स्वतः ला खूप भाग्यवान समजतो कि आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे, सगळे संत महात्म्यांचे आशीर्वाद, महापुरुषांचे आशीर्वाद आणि या श्रीरामपुरातील तमाम स्वाभिमानी जनतेच्या आणि संघटनेचे सगळे ज्येष्ठ श्रेष्ठ व सर्व माता भगिनी यांनी जे कष्ट घेतले त्या सर्वांच्या मदतीने आपण सर्वप्रथम आलो. या मंचावरून मी एकच सांगेल की इथून पुढच्या आपल्या काळामध्ये आपण सगळे मतभेद विसरून श्रीरामपूरचा विकास एवढे एकमेव ध्येय समोर ठेवून, सगळ्यांना बरोबर घेऊन एक दैदिप्यमान आणि आपले श्रीरामपूरचे नाव राज्यांमध्ये नावारूपाला करण्यासाठी मनापासून प्रयत्न करू त्यासाठी आपल्या सर्वांची साथ महत्त्वाची आहे. आपल्याला पूर्वीचे वैभवशाली श्रीरामपूर परत निर्माण करायचे आहे. या कामी सर्वांनी पुढेही साथ द्यावी असे आवाहन केले. याप्रसंगी सर्वधर्म गुरुंचे आशिर्वाद घेण्यात आले. हभप वीर महाराज, शिख समाजाचे ग्यानी मिस्कीन, ख्रिस्ती समाजाचे फादर प्रकाश भालेराव, बौद्ध धर्म गुरु तसेच मौलानांचे संदेश नगरसेवक मुझफ्फर शेख यांनी वाचून दाखवले. तत्पूर्वी करण ससाणे यांचे नगरपालिकेजवळ आगमन होताच ढोल ताशाच्या प्रचंड गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित लोकांवर जेसीबी मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. नगरपालिका प्रांगणात प्रवेश करताच त्यांनी प्रथमतः शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार अर्पण केला. वर आल्यानंतर नगराध्यक्षाच्या केबिनमध्ये मावळते प्रशासक तथा प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील व मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसवले. यानंतर यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये पुढील सोहळा पार पडला. कार्यक्रमात काँग्रेस पक्षाचे नगरपालिकेचे पक्ष प्रतोद मुजफ्फर शेख यांनी स्वागत केले सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले तर आभार नगरसेवक राजेंद्र पवार यांनी मानले. पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने नगरपालिका इमारतीवर विद्युत रोशनी करण्यात आली असून प्रत्येक पायरीवर रांगोळी काढण्यात आली होती. माजी आ. जयंत ससाणे यांच्या काळात नगरपालिकेच्या प्रवेशद्वाराशेजारी असलेल्या हॉलमध्ये जनसंपर्क कार्यालय उभारण्यात आले होते. मागील निवडणुकीत अनुराधा आदिक निवडून आल्यानंतर त्यांनी ते कार्य बंद करून तेथे पाणीपुरवठा विभागाला जागा दिली होती. मात्र काल पुन्हा एकदा त्या ठिकाणी जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात येऊन पाणीपुरवठा विभाग दुसरीकडे शिफ्ट करण्यात आला.

### नियोजनाचा अभाव

**करण ससाणे यांच्या या पदग्रह सोहळ्यासाठी शहर व तालुक्यातील काँग्रेस प्रेमींनी मोठी गर्दी केली होती.यशवंतराव चव्हाण सभागृहात खाली हॉलमध्ये गॅलरी सुद्धा जागा पुरली नाही. कार्यक्रमाचे कोणतेही नियोजन केल्याचे दिसून येत नव्हते त्यामुळे थोडासा विस्कळीतपणा आला. बैठक व्यवस्था सदोष केलेली असल्याने अनेकांना उभे राहावे लागले.**

### करण ससाणे गहिवरले

**अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पदग्रहण सोहळा संपन्न होत असताना उपस्थित सर्वांनी माजी आ. जयंत ससाणे यांचा जयजयकार केला. त्यावेळी आपल्या वडिलांचे आठवणीने नगराध्यक्ष करण ससाणे यांचे डोळे पानावले.**

### विरोधक अनुपस्थित

**या पदग्रहण समारंभात नगराध्यक्ष पदाचे शिवसेनेचे उमेदवार अशोक मामा थोरे यांनी उपस्थित राहून कारण ससाणे यांचा सत्कार केला मात्र दुसरे प्रमुख विरोधी उमेदवार श्रीनिवास बिहानी तसेच विरोधी भाजपाचे व शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक अनुपस्थित होते.काँग्रेस पक्षाचे सर्व २० नगरसेवक मात्र उपस्थित होते.**

### एकावर एक फ्री नाही

**सभागृहात प्रचंड गर्दी झाली होती नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका व्यासपीठावर येत असताना महिला नगरसेविकांसोबत त्यांचे नातेवाईक सुद्धा वर येत होते त्यावेळी गटनेते मुजफ्फर शेख यांनी फक्त महिला नगरसेवकांनी वर यावे आज एकावर एक फ्री नाही अशी कोटी केली. त्यावर सभागृहात एकच हशा पिकला.**

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत संदीप गायकवाडला कास्यपदक

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय तसेच मोटेवाडी कुस्ती केंद्र, पाटस येथील पैलवान संदीप गायकवाड याने छत्रपती सांभाजीनगर येथे ता. १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आयोजित १७ वर्षांखालील फेडरेशन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत ८० किलो वजनगटात कास्य पदक पटकावले आहे.

संदीप गायकवाड हा मोटेवाडीचे सरपंच व वस्ताद संभाजी खडके यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करीत आहे. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन



व क्रीडा क्षेत्रातून त्याचे कौतुक होत आहे.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी आ. बबनराव पाचपुते, समिती सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व माजी आ. राहुल जगताप, महावीर पटवा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात व प्रा. श्रीकांत थोरात, विभागप्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव संतोष भुजबळ तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, क्रीडा समिती सदस्य व क्रीडाशिक्षकांनी संदीपचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संदीप गायकवाड याला क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल, प्रशिक्षक अण्णा गायकवाड तसेच पैलवान सुरेश पालवे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# ग्रामीण विकासासाठी कृषीकन्यांचा पुढाकार

## पिंपळगाव माळवी येथे ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण

**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयातील कृषी कन्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यक्रमांतर्गत ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणाचे आयोजन केले. या उपक्रमात मुळे अश्विनी, मुठे साक्षी, निमसे मानसी, राऊत प्रतीक्षा, रोडे साक्षी, सावंत, फुले किरण या विद्यार्थिनींनी गावकऱ्यांच्या सहभागातून विविध मूल्यांकनात्मक आराखडे तयार केले. शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून सामाजिक नकाशा, जलसंपदा नकाशा, दळणवळण नकाशा, प्रमुख पिकांचा आराखडा तसेच शेती यांत्रिकीकरणाचे नकाशे तयार करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थिनींनी गावातील विविध समस्या, उपलब्ध संसाधने व शेतीविषयक अडचणी जाणून घेतल्या. तसेच गावकऱ्यांशी चर्चा करून



त्यांच्या सूचना व अभिप्राय संकलित करण्यात आले. विद्यार्थिनींनी गावाची सद्यस्थिती, शेतीची परिस्थिती, उत्पादन पद्धती तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला. गावातील विविध संसाधने व सामाजिक संस्थांचे दर्शन घडवण्यासाठी रंगीत रांगोळ्यांच्या माध्यमातून सामाजिक संसाधन नकाशा तयार करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थिनींना ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे जीवनमान व त्यांच्या शेती व्यवसायाशी संबंधित वास्तव अनुभवण्याची संधी मिळाली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत, कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. पूनम ठोबरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सरपंच राधिका प्रभुणे, उपसरपंच मच्छिंद्र झिने, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय वाळके, ग्रामपंचायत सदस्य संगीता संदीप झिने, कृषी अधिकारी योगेश घोलप, गिरिधारी बैरागी, मेजर विश्वनाथ गुंड, ज्ञानदेव गुंड, बबन गुंड, विश्वनाथ झिने, मोठेबाबा गुंड, विक्रम बोरा तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसएसजीएम महाविद्यालयात करिअर संधींवर मार्गदर्शन कार्यशाळा

**कोपरगाव । किसन पवार**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्टस् अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे एम.बी.ए. प्रवेश प्रक्रिया, मुलाखत तंत्र तसेच करिअरच्या विविध संधींवर मार्गदर्शन करणारी विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली. ही कार्यशाळा रयत स्पर्धा परीक्षा अकादमी, वाणिज्य संघटना, करिअर मार्गदर्शन व नियोजन विभाग तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृष्णा थोरात यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, एम.बी.ए. प्रवेशासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये तर्कशक्ती, संख्यात्मक क्षमता, भाषिक कौशल्ये तसेच डेटा विश्लेषण



या घटकांचे मूल्यमापन केले जाते. प्रवेश परीक्षेनंतर समूहचर्चा, वैयक्तिक मुलाखत व शैक्षणिक कामगिरीच्या आधारे अंतिम निवड केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण सराव यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी स्वपरिचय पत्राचे महत्त्व स्पष्ट केले. स्वपरिचय पत्र हे उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाचे, ध्येयाचे व क्षमतांचे प्रतिबिंब असून प्रवेश प्रक्रियेत आणि मुलाखतीदरम्यान ते पहिला ठसा उमटवते. त्यामुळे ते प्रामाणिक, अभ्यासपूर्ण व प्रभावी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत यांनी केले. यावेळी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, प्रा. महेश दिघे, प्रा. दिलीप भोये, प्रा. किरण पवार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनील काकडे व प्रा. तृप्ती कुलथे यांनी केले, तर आभार डॉ. सीमा दाभाडे यांनी मानले.

# खेळ आनंदी जीवनाची गुरुकिल्ली- सचिन जगताप

## भिंगार येथे फिनिक्स स्पोर्ट्स अकॅडमीचे उद्घाटन

**अहमदनगर । समीर मन्यार**

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत माणूस स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असून त्यामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. निरोगी जीवनासाठी नियमित व्यायामासोबत खेळांची जोपासना आवश्यक असून खेळ हे आनंदी व सुदृढ जीवनाची गुरुकिल्ली आहेत, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांनी केले. ते भिंगार येथे फिनिक्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, संतोष धोंगडे, विशाल गर्जे उपस्थित होते. तसेच प्रज्वल भिंगारदिवे, शैलेश गवळी, खालिद सय्यद, प्रदीप जाधव, विन्सेंट फिलिप्स, मेहरुद्दीन पठाण, रवी डिक्रुझ, शादाब खान, भैय्या परदेशी, लॉरेन्स स्वामी, सोनू भुजबळ, भाऊ भिंगारदिवे, प्रसाद पाटोळे यांच्यासह क्रीडाप्रेमी, खेळाडू व



नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगताप पुढे म्हणाले की, भिंगार परिसरात फिनिक्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातून खेळाडूंना दर्जेदार व सुरक्षित मैदाने उपलब्ध झाली आहेत. फुटबॉल, क्रिकेट व व्हॉलीबॉलसाठी आधुनिक सुविधा असल्याने परिसरातील युवकांना मोठा फायदा होणार आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक आरोग्य, शिस्त, संघभावना व आत्मविश्वास वाढतो. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, मोबाईलच्या अतिवापरामुळे युवकांचे आरोग्य धोक्यात येत असून खेळ व निसर्गाशी नाते जोडणे आवश्यक आहे. खेळामुळे वजन नियंत्रणात राहते, तणाव कमी होतो व सकारात्मक जीवनशैली निर्माण होते. फिनिक्स स्पोर्ट्सचे संचालक प्रज्वल भिंगारदिवे यांनी सांगितले की, सहा वर्षांवरील खेळाडूंना येथे प्रशिक्षण दिले जाणार असून अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना प्रशिक्षित मार्गदर्शकांकडून दर्जेदार प्रशिक्षण दिले जाईल. यावेळी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आजी-माजी खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. या क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते. त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आणि मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ संशोधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ. विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इस्रो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, ते स्वप्न पहायचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# उद्योजक व महिला खेळाडूंचा सन्मान

## अग्नीपंख फाउंडेशनचा उपक्रम



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महान उद्योजक रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त तसेच अंध उद्योजक भावेश भाटिया यांच्या वाढदिवसानिमित्त अग्नीपंख फाउंडेशनच्या वतीने श्रीगोंदा ते नायगाव अशी १३७ किलोमीटरची प्रेरणा सायकल वारी आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा समारोप नायगाव येथे झाला. यावेळी उद्योजक व महिला खेळाडूंचा सन्मान तसेच 'उद्योग विश्वातील रिअल हिरो' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले विद्यालयातील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे व उद्योजक भावेश भाटिया यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना राहीबाई पोपेरे म्हणाल्या की, पद्मश्री पुरस्कारानंतर अग्नीपंख फाउंडेशनने पोपेरेवाडीतील शाळा डिजिटलीकरण करून माझा सन्मान केला, ही बाब कायम स्मरणात राहील. मानवी आरोग्यासाठी काळी माती व देशी बियाण्यांचे संवर्धन अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्योजक भावेश भाटिया यांनी सांगितले की, अग्नीपंख फाउंडेशन भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांवर प्रेरित होऊन शाळा, विद्यार्थी व खेळाडूंसाठी सेवाभावी कार्य करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून उद्योगशीलतेची बीजे रुजवणे गरजेचे आहे. यावेळी बाबुराव बोत्रे यांनी मराठी तरुणांनी उद्योग क्षेत्रात धाडसाने उतरावे, निश्चित यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनाथ दरेकर यांनी केले. यावेळी प्रकाश कुतवळ, राजाराम शिंदे, नवनाथ मोहन दरेकर, प्रमोद दिवटे, प्रशांत धुमाळ यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास तहसीलदार सुरेखा ढोले, निता भाटिया, सहाय्यक निबंधक नारायण परजणे, ढवळे गहिनीनाथ, प्रा. संजय लाकूडझोडे, मोहन आढाव, सुनील अनभुले, स्वाती जमदाडे, अविनाश वाडकर, शिदू नेवसे, भाऊसाहेब वाघ, ॲड. कावेरी गुरसल, राजकुमार इथापे, किसन वऱ्हाडे, मारुती वागस्कर आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल चव्हाण यांनी केले तर आभार नवनाथ खामकर यांनी मानले.

**सन्मानित उद्योजक व खेळाडू**

**बबनराव शेळके, बाबुराव बोत्रेपाटील, प्रकाश कुतवळ, संजय उंडे, बाळकृष्ण पानसरे, प्रताप पवार, सोमनाथ होळकर, अंकुश घाडगे, प्रमोद दिवटे, दत्तात्रय मेहत्रे, नवनाथ दरेकर, राहुल शेलार, सतीश मचे, आनंद जगदाळे, बंडू पवार, विजया गाडीलकर, संतोष नागवडे, चंद्रकांत चौधरी, मयूर गोरखे, प्रांजली धुमाळ, सिद्धी शिर्के (महिला खेळाडू), विजय जगदाळे, रमेश साळुंके, संकेत गांजुरे, विजया लंके, अनिकेत वाबळे (सायकलपटू).**



# शहराच्या जडणघडणीत पत्रकारांचे मोठे योगदान– नगराध्यक्ष आव्हाड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने माध्यमांचे योगदान अत्यंत मोलाचे असून पालिका निवडणुकीदरम्यान पत्रकारांनी घेतलेली सकारात्मक व परिपक्व भूमिका कौतुकास्पद आहे. त्यामुळेच निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शकपणे पार पडली, असे मत नवनिर्वाचित नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी व्यक्त केले. पालिकेच्या सभागृहात नव्याने निवडून आलेले सर्व नगरसेवक आणि शहरातील पत्रकार यांचा परस्पर परिचय व्हावा या उद्देशाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यापूर्वी सत्ताधारी आघाडीच्या सदस्यांनी पाणीपुरवठा, आरोग्य, विद्युत आदी विभागांचा आढावा घेतला. याचवेळी शहरातील पत्रकारांचा सन्मान व परिचय सोहळा पार पडला. यावेळी बोलताना नगराध्यक्ष आव्हाड म्हणाले की, शहर व तालुक्याच्या जडणघडणीत पत्रकारांचे मोलाचे योगदान राहिले आहे. अभ्यासू व समाजाभिमुख पत्रकारितेमुळे लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन मिळते. शहर व उपनगरांतील रस्ते, वीज, पाणी आदी मूलभूत सुविधांसाठी प्रत्येक प्रभागात पालिकेचे अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांसह पाहणी दौरे करण्यात येणार असून त्यानुसार कृती आराखडा तयार केला जाणार आहे. निवडणुकीदरम्यान दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व सदस्य एकदिलाने काम करत आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून आता राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी विकासासाठी एकत्र यावे. गैरसमज असल्यास ते दूर करून शहराच्या परिवर्तनासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. पत्रकारांनी वेळोवेळी सूचना व मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी नगरसेवक अमोल गर्जे, बजरंग घोडके, मंगल कोकाटे, डॉ. शारदा गर्जे यांनी मनोगत व्यक्त करत पत्रकारांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पत्रकारांच्या वतीने उमेश मोरगावकर यांनी आपले विचार मांडले, तर अविनाश मंत्री यांनी आभार मानले.




# गालिब यांचे साहित्य, जीवनाकडे संवेदनशील नजरेने पाहण्याची प्रेरणा देते– ॲड. धाराणी

## मखदूम सोसायटीकडून मिर्झा गालिब जयंती साजरी

**अहमदनगर । आबीद खान**

गालिब यांचे साहित्य माणसाला विचार करायला शिकवते, वेदनांतून सौंदर्य शोधण्याची दृष्टी देते आणि जीवनाकडे संवेदनशील नजरेने पाहण्याची प्रेरणा देते. अशा महान साहित्यिकाच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने बालघर प्रकल्पातील निराधार व गरजू मुलांना कच्चे खाद्य पदार्थ वाटप करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. आजची ही मुले म्हणजे उद्याचा भारत असून त्यांच्या पोटात अन्न आणि मनात आशा निर्माण करणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो आणि समाजात माणुसकीची भावना अधिक दृढ होते, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या ॲड. गुलशन धाराणी यांनी केले. मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने प्रसिद्ध उर्दू कवी मिर्झा गालिब यांच्या जयंतीनिमित्त तपोवन रोड येथील बालघर प्रकल्पातील मुलांना कच्चे खाद्य पदार्थ भेट देण्यात आले. यावेळी अहमदनगर सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष नईम सरदार, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, बालघर प्रकल्पाचे प्रमुख युवराज गुंड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना युवराज गुंड यांनी सांगितले की, गालिब यांचे विचार आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालणारे उपक्रम सातत्याने राबविले गेले पाहिजेत. समाजातील प्रत्येक घटकाने अशा कार्यात सक्रिय सहभाग घेतला, तर एक सुसंस्कृत, संवेदनशील आणि सक्षम समाज निश्चितपणे घडू शकतो. या उपक्रमातून साहित्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम साधत गालिब जयंती केवळ औपचारिक न राहता कृतीशील पद्धतीने साजरी करण्यात आल्याची भावना उपस्थितांमध्ये व्यक्त करण्यात आली.

# अंदिजान पोल्का : उझबेक संस्कृतीची धडकन आणि वारशाचा जागतिक प्रवास- डॉ. पटेल




मध्य आशियातील सांस्कृतिक वारशामध्ये 'अंदिजान पोल्का' हे नाव केवळ एका नृत्यकलेचे प्रतिनिधित्व करत नाही, तर उझबेकिस्तानच्या ऐतिहासिक सातत्याचे आणि सामाजिक मूल्यांचे प्रतीक आहे. अलीकडे प्रकाशित झालेल्या ''Andijan Polka: Tradition, Values, and Modernity'' या मोनोग्राफद्वारे लेखकांनी या नृत्याचे असे अनोखे पैलू उलगडले आहेत, ज्यामुळे त्याला जागतिक स्तरावर एक स्वतंत्र ओळख मिळते.

**बाबुरी वारसा आणि ऐतिहासिक मुळे** – अंदिजान पोल्काची मुळे फरगना खोऱ्यातील समृद्ध इतिहासात खोलवर रुजलेली आहेत.

विद्वानांच्या मते, हे नृत्य बाबुरी काळातील (१६वे शतक) कलात्मक चेतनेचा विस्तार आहे. जहिरुद्दीन मुहम्मद बाबर यांनी त्यांच्या आत्मचरित्र 'बाबरनामा' मध्ये फरगनातील उत्सव आणि नृत्यप्रकारांना ''मानवी भावनांचे परिष्करण'' असे संबोधले आहे. जरी 'पोल्का' हा शब्द १९व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपीय प्रभावामुळे वापरात आला, तरी या नृत्याची आत्मा पूर्णपणे स्थानिक आणि स्वदेशी आहे.

**पुरुषार्थी जोश आणि वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक शैली** – अंदिजान पोल्काची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्याची पुरुषार्थी गतिशील भाषा (Kinetic Language).

उझबेक लोकनृत्यांच्या अनेक शैलींपेक्षा वेगळे असे हे नृत्य प्रामुख्याने पुरुषांकडून सादर केले जाते. यात मर्दिक (वीरता), शिस्त आणि सामुदायिक अभिमान यांचे दर्शन घडते.

**लय आणि संगीत** – याची तालरचना ४/४ आणि ६/८ दरम्यान बदलत राहते, ज्यामुळे तीव्र ऊर्जा निर्माण होते.

**शारीरिक हालचाल** – पायांची अचूक हालचाल (Footwork), खांद्यांचे संचालन आणि चेहऱ्यावरील सूक्ष्म भाव यांचा सुंदर समन्वय आढळतो. वेशभूषा: नर्तक पारंपरिक 'चपन' (झगा) आणि 'त्युबेतैका' (टोपी) परिधान करतात, जे त्यांच्या प्रादेशिक अभिमानाचे प्रतीक आहे.

**एथ्नोपेडागॉजी** – नृत्यातून संस्कार या मोनोग्राफचे लेखक बख्तियार रसुलोव, मुहैयो अर्टिकोवा आणि असरार अल्लायारोव यांनी या नृत्याच्या शैक्षणिक (Pedagogical) महत्त्वावर विशेष भर दिला आहे. अंदिजान पोल्का केवळ मनोरंजन नसून, युवकांसाठी नैतिक आणि शारीरिक शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे.

**शिस्त** – गुंतागुंतीचे पावले आणि अचूक वेळेचे भान युवकांमध्ये संयम व शिस्त निर्माण करते.

**गुरु–शिष्य परंपरा** – याचे शिक्षण 'उस्तोजशोगिर्द' पद्धतीवर आधारित असून, मौखिक व प्रात्यक्षिक मार्गे ज्ञान पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित होते.

**सामुदायिक ऐक्य** – हे नृत्य सामूहिक आनंद आणि सामायिक ओळखीची भावना दृढ करते.

**युनेस्को आणि जागतिक ओळख**– सध्या अंदिजान पोल्काला युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा (Intangible Cultural Heritage) प्रतिनिधी यादीत समाविष्ट करण्यासाठी ठोस प्रयत्न सुरू आहेत. पिढ्यान्पिढ्यांचे हस्तांतरण, सामुदायिक ओळख आणि सांस्कृतिक विविधता यांसारखी युनेस्कोची सर्व निकषे हे नृत्य पूर्णपणे पूर्ण करते.

**जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे** प्रा. अखलाक अहमद अहान यांच्या मते, अंदिजान पोल्काची ऊर्जा आणि शैक्षणिक मूल्ये यामुळे ते जगातील महान लोकवारशांच्या श्रेणीत उभे राहते. भारत आणि उझबेकिस्तान यांच्यातील सांस्कृतिक सेतू म्हणूनही या नृत्याची भूमिका महत्त्वाची आहे.

**निष्कर्ष**– अंदिजान पोल्का हा उझबेक जनतेच्या लवचिकतेचा आणि त्यांच्या कलात्मक जिवंतपणाचा सशक्त पुरावा आहे. तो इतिहासाला आधुनिकतेच्या नव्या तालाशी जोडतो. आज हे नृत्य केवळ एक प्रादेशिक ठेवा नसून, मानवतेच्या सामायिक सांस्कृतिक वारशातील एक तेजस्वी तारा आहे.

# अश्रू आनंदाचे अन् दु:खाचेही; करण ससाणे पदभार सोहळा; श्रीरामपुर मध्ये सबकूछ काँग्रेस

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

चाहत्यांचा गराडा आणि ओसंडून वाहणारा आनंद एकीकडे हे दृष्य तर इतरत्र निष्ठावंतांच्या डोळ्यात अश्रू वाहत असताना अनेकांना दुःख लपविता आले नाही. अश्रू आनंदाचे आणि अश्रू दु:खाचेही असे दोन्ही प्रसंग काल नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या पदग्रहण सोहळ्यात पहावयास मिळाले. श्रीरामपूर नगरपालिकेच्या अत्यंत रोमहर्षक अशा चौरंगी लढतीच्या निवडणुकीत करण ससाणे यांनी विजयश्री खेचून आणली. नगराध्यक्ष पदाचा काल त्यांनी पदभार स्वीकारला.

प्रशासक किरण सावंत पाटील आणि मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी प्रक्रिया करून ससाणे यांच्याकडे पदभार सोपविला. सर्व जाती धर्मांच्या धर्मगुरूंच्या उपस्थितीत तसेच शहर आणि ग्रामीण भागातील असंख्य कार्यकर्त्यांच्या साक्षीने ससाणे यांनी हा नगराध्यक्ष पदाचा पदभार ग्रहण केला. माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे, आ. हेमंत ओगले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, तालुकाध्यक्ष भोसले, बाबासाहेब दिघे, भारती कांबळे, अशोक थोरे, दिपाली ससाणे, लकी सेठी, मोहम्मद शेख, नवनीत कौर सेठी, सुधीर नवले, मोहन कुकरेजा, माऊली मुरकुटे, अफरोज शाह, डॉ. वंदना मुरकुटे, अंजुम शेख, जेष्ठ पत्रकार पद्माकर शिंपी, आदि असंख्य आजी–माजी नगरसेवक, नगरसेविका शहर आणि ग्रामीण भागातील काँग्रेसचे अनेक मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. ढोल ताशांच्या निनादात प्रारंभी जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली. पालिकेची मुख्य प्रवेश द्वार असलेली स्वागत कमान सजवून तेथे विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

पदग्रहण समारंभावेळी एकीकडे स्व. जयंत ससाणे यांच्या नावाचा जयघोष चालू असताना दुसरीकडे नगराध्यक्ष पदाचा पदभारात दंग असलेल्या असंख्य चाहत्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. याच वेळी मात्र स्व. जयंत ससाणे यांच्याबरोबर पहिल्यापासून काम करणारे काही नगरसेवक कार्यकर्ते यांनी अश्रूद्वारे आपल्या आनंदाला वाट मोकळी करून दिली. अश्रू आनंदाचे आणि दुःखाचेही अशीच काहीसे वर्णन या सोहळ्याचे करता येईल. नूतन नगराध्यक्ष करण ससाणे, आ. हेमंत ओगले अशी अनेकांची यावेळी भाषणे झाली. काँग्रेसचे गटनेते मुजफ्फर शेख यांनी या सर्व त्या कार्यक्रमाचे व्यवस्थित सूत्रसंचालन केले. नगरसेवक राजेंद्र पवार यांनी उपस्थित आमचे आभार मानले.

**सूरज देख रुक गया है**

**राष्ट्र वादी शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष लकी सेठी यांनी '' सूरज देख रुक गया है..... तेरे आगे आज सूरज झुक गया है..... असा व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या.**

**करण ससाणे यांनी केली कमाल**

**काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांना जे जमलं नाही ते करण ससाणे यांनी करून दाखविले आहे. जिल्ह्यात काँग्रेस आणि पक्ष चिन्ह पंजा जिवंत ठेवण्याचे अजरामर काम ससाणे टीम ने केले. करण ससाणे यांनी कमाल केली अशी सर्व सभगृहात हीच चर्चा होती.**